# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र. :-रानिआ/मनपा२००५/प्र.क्र.१७/का.०५
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०२/०७/२०१३

विषय - स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघांची पुर्नरचना.
कामकाज गोपनीयरित्या हाताळण्याबाबत...
संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का.५,
दिनांक २४ ऑक्टोबर, २००५.

## आदेश

राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रभाग रचनेचा मसूदा जाहीर करण्याअगोदरच ही प्रभाग रचना हे कामकाज हाताळणा-या व्यक्तींव्यतिरिक्त अन्य व्यक्तींना तसेच प्रसिध्दी माध्यमांना माहित होते. महानगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगाने प्रभाग रचनेबाबत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देताना यासंदर्भात नागरीक मोठया प्रमाणावर हरकत घेताना दिसून आले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने मतदारसंघांच्या (महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, ग्रामपंचायती यांचे प्रभाग, जिल्हा परिषद मतदार गट व पंचायत समिती मतदार गण) पुर्नरचनेच्या कामकाजामध्ये राजकीय व्यक्तींचा हस्तक्षेप टाळण्याकरिता हे कामकाज गोपनीय स्वरुपात हाताळण्यात यावे अश्या सूचना संदर्भाधिन आदेशान्वये दिलेल्या आहेत. मात्र या आदेशांकडे दुर्लक्ष करुन प्रभागरचनेची माहिती राजकीय व्यक्ती अथवा प्रसिध्दी माध्यमांचे प्रतिनिधी यांना देण्यात येते. मतदारसंघांची माहिती प्रसिध्द होण्यापूर्वीच राजकीय व्यक्तींना माहित झाल्यास त्यांच्याकडून सोयीची प्रभाग रचना होण्याबाबत दबाव येऊ शकतो. ब-याचदा मतदारसंघांचे आरक्षण हे प्रभागांच्या रचनेवर अवलंबून असते. आरक्षणात बदल करण्याच्या दृष्टीनेही राजकीय व्यक्तींकडून दबाव येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरील परिस्थितीत पुन्हा आदेशित करण्यात येते की, मतदारसंघांची पुर्नरचना करताना हे कामकाज अत्यंत गोपनीय स्वरुपात हाताळण्यात येईल याची दक्षता घ्यावी. राज्य निवडणूक आयोगाने अथवा प्राधिकृत अधिका-याने प्रथम प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर आरक्षित प्रभाग निश्चित करण्याकरिता सोडत काढण्यात येते आणि त्याच दिवशी प्रभागांची रचना नागरीकांच्या माहितीकरिता सोडतीच्या ठिकाणी प्रथम जाहीर करण्यात येते. त्यामुळे प्रभाग रचनेच्या कामकाजास सुरुवात केल्यापासून ते सोडतीच्या वेळी प्रभाग रचना जाहीर करेपर्यंतच्या कालावधीमध्ये प्रभाग रचनेचा तपशिल अनधिकृत व्यक्तींना अथवा प्रसिध्दी माध्यमांना माहित होणार नाही याबाबत पुरेशी खबरदारी घेण्यात यावी. कोणत्याही अधिका-याने / कर्मचा-याने अशी माहिती दिल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई त्वरित सुरु करण्यात यावी. या आदेशाचे पुरेपूर पालन होईल अशा सक्त सूचना प्रभाग रचनेचे काम हाताळणा-या सर्व संबंधितांना वेळोवेळी देण्यात याव्यात.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( पूनम शिरसोळकर )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :
१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व महानगरपालिका आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व नगरपरिषदा, नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
६. निवड नस्ती.